।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४२

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि.२० एप्रिल २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक १७ वा


# सांगोला शहरातील जुन्या स्टेट बँके जवळ असलेल्या देशी-विदेशी दारु विक्रीचे दुकान बंद करा सांगोला शहरातील नागरिकांची लेखी तक्रार करून मागणी

## चोर सोडून संन्याशाला फाशी; राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह!

सांगोला : सांगोला शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी जुन्या स्टेट बँके जवळ असलेल्या देशी-विदेशी दारू विक्रीच्या दुकानामुळे या परिसरात मोठया प्रमाणात मद्यपी दिवस रात्र मद्यपान करून त्याच परिसरात ठिय्या मांडून दारू पित बसतात याचा मोठा त्रास या भागातील नागरिकांना होत असलेने सदरील दारू विक्रीचे दुकान तात्काळ बंद करण्यात यावे याबाबतची लेखी तक्रार नागरिकांनी केलेली आहे.या दारू विक्री दुकान मुळे हा परिसर म्हणजे मद्यपान करणाऱ्यांचा फेव्हरेट मद्यपान पॉंईट झालेला आहे.याचा मोठा त्रास या परिसरात राहणाऱ्या रहिवाश्यांना होत असून या रस्त्यांवरून शहरातील महिलावर्ग जाण्यास टाळतात.या परिसरात राहणार्रया नागरिकांचे जीवन या दुकानांमुळे नरक झाले असून येथे दारू पिणारे दारूडे याच ठिकाणी बसून भांडणे,शिवराळ भाषेत शिवीगाळ करीत असतात तसेच संध्याकाळच्या वेळी याठिकाणी अक्षरक्षः यात्रेचे स्वरूपासारखी गर्दी असते त्याचा प्रचंड त्रास रहिवाशांना होत आहे.त्यामुळे रहिवाशी भागात असलेले हे दारू विक्रीचे दुकान बंद केले जावे अशी आग्रही मागणी सांगोला शहरातील नागरिकांतून केली जात आहे. या वाईन शॉपमधुन सांगोला तालुक्यातील अनेक भागात चार चाकी वाहनांतून दारू विकत घेवून विक्री केली जात असल्याचीही चर्चा असून सांगोला शहरातील देखील अनेक परमिट रूम,बिअर बार मध्ये या वाईन शॉपची दारू असते असे ही बोलले जात आहे.मुळात शासनाच्या नियमानुसार फक्त काऊंटरवरतीच किरकोळ दारू विक्रीचा नियम असताना शासनाचा नियम धाब्यावर बसवून या दुकानातून मोठया प्रमाणात बल्कमध्ये देशी-विदेशी दारूची विक्री केली जात असल्याने याकडे स्थानिक पोलिस व राज्य उत्पादन शुल्क विभाग जाणीवपुर्वक दुर्लक्ष करत असल्याची चर्चा सांगोला शहरवासियांतून केली जात आहे.तसेच सदरील दारू विक्री दुकानाच्या पाठीमागचे नरसोबा मंदिर,जवळच मस्जिद व हाकेच्या अंतरावर किल्यातील म्हसोबाचे मंदिर असल्याने या देशी-विदेशी दारू विक्रीच्या दुकान देशी-विदेशी दारू विक्रीच्या दुकानास नगरपालिका,पोलिस स्टेशन व राज्य उत्पादन शुल्क विभागाने परवाना दिलाच कसा ? यावरतीच संशय व्यक्त होवू लागला आहे.सदरचे दुकान हे पुर्वी स्टेशन रस्त्यावर होते,तेथून या ठिकाणी स्थलांतर करताना शासनाचे नियम धाब्यावर बसवून मोठया आर्थिक देवाण-घेवाण ही झाली असल्याचेही नागरिकांतून बोलले जात आहे.आतासुध्दा सांगोला नगरपालिका, राज्य उत्पादन शुल्क विभागाने कोणतीही भीड-भाड न राखता येथील रहिवाशी,नागरिक यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने नियम व अटी याची परत पडताळणी करून हे दारू विक्री दुकान सदरील ठिकाणाहून बंद करण्याचे दृष्टिने योग्य ती पावले उचलावीत अशी मागणी सांगोला शहरवासियांतून केली जात आहे.



**चोर सोडून संन्याशाला फाशी..**

या दारू विक्री दुकानावर कार्यवाहीची मागणी नागरिकांनी केल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाने सदरील दुकान या ठिकाणाहून दुसरीकडे स्थलांतर करणेकामी कार्यवाही करणे अपेक्षित असताना उलटपक्षी राज्य उत्पादन शुल्क विभागाने या दुकानाच्या समोर असलेल्या हातगाडीवर चालक असलेल्या दुकानदारालाच महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमातील तरतुदीचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेणेबाबतची लेखी नोटीस दिल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.ज्या दुकानाबाबत नागरिकांच्या तक्रारी आहेत त्या दुकानावर कोणतीच ठोस कार्यवाही न करता चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याचा हा प्रकार असल्याचे बोलले जात आहे.

**राज्य उत्पादन शुल्क विभागाचा कारभारावरच प्रश्नचिन्ह..**

सांगोला शहर व तालुक्यातील अनेक बिअर शॉपी मध्ये परमिट रूमच्या सुविधा पुरवल्या जात असून सर्रास बिअर शॉपीमध्ये टेबल वर बसून बिअर पिण्याची सोय केलेली असून देशी दारू तर तालुक्यातील खेडोपाडी सहजच मिळत असल्याने खेडोपाडी देशी दारू विक्रिचे पेव सुटलेले आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कर्मचारी व अधिकारीच अवैद्य दारू विक्री करणाऱ्या बरोबरच फिरत असलेने या विभागाच्या एकुण कारभारावरतीच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.याबाबत लवकरच काही जाणकार या खात्याचे मंत्री उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भेटून हा सर्व प्रकार त्यांच्या निर्दशनास आणून देणार असल्याचे समजते.

## उन्हाळा असल्याने गरम होते म्हणुन घराच्या मुख्य दरवाजाची कडी लावुन घराच्या पोर्चमध्ये झोपले आणि चोरट्यांनी पळविला पावणे नऊ लाख रुपयांचा मुद्देमाल

सांगोला : राहत्या घराचे दरवाजाची कडी उघडुन बेडरुमधील लोखंडी पेटीचे कुलुप चावीच्या बॉक्स मधुन चावी घेवुन उघडुन अज्ञात चोरट्याने ८ लाख ७५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरुन नेली असल्याची घटना पाचेगाव ब्रु ता.सांगोला येथे दि.१७ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास घडली. चोरीची फिर्याद सिताराम बिले (रा.पाचेगाव ब्रु, ता.सांगोला) यांनी सांगोला पोलीस स्टेशनला दिली आहे.

चोरट्यांनी १,२५,०००/- पाच तोळे वजनाच्या दोन सोन्याच्या बांगड्या, १,२५,०००/ - पाच तोळे वजनाचे सोन्याचे गंठण, ७५,०००/- तीन तोळे वजणाचा लक्ष्मी हार, २५,०००/- एक तोळे वजनाची बोरमाळ,२५,०००/ एक तोळे. वजनाचे बारीक मण्याचा हार , २५,०००/- एक तोळे वजनाचे फुले झुबे, २५,०००/- एक तोळे वजनाची अंगठी व रोख रक्कम ४,५०,००० असा एकूण ८ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल पळवून नेला आहे.

सांगोला पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी. की, दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी रात्री जेवन झाल्यानंतर सिताराम बिले व त्यांच्या पत्नी असे उन्हाळा असल्याने गरम होते म्हणुन घराच्या मुख्य दरवाजाची कडी लावुन घराच्या पोर्चमध्ये रात्री ११ वाजण्याच्या सुमारास झोपले होते. त्यानंतर दिनांक १८ एप्रिल २०२५ रोजी रात्री २ वाजणेच्या सुमारास फिर्यादी हे लघुशंके करिता उठले असता तेव्हा दरवाज्याच्या समोरील लोखंडी गेट उघडे दिसले, ते पत्नीला उठल्यानंतर लागेल म्हणुन त्याला कडी लावली. त्यानंतर पोर्चच्या खाली सोडलेली चप्पल दरवाज्या जवळ दिसली. परंतु चप्पलमध्ये विटेचा तुकडा होता. तो काढुन फेकुन देवुन घरासमोरील मोकळ्या जागेत लघुशंका करुन पुन्हा झोपले. त्यानंतर नेहमी प्रमाणे पहाटे ०५/३० वाजणेच्या सुमारास उठुन घराची कडी उघडुन घरात प्रातविधी करिता गेलो, असता दोन्ही बेडरुमचे दरवाजे उघडे दिसले. झिरो बल्बच्या उजेडात बेडरुम मधील कपाटातील कपडे व इतर साहित्य व पत्नीची पर्स अस्थाव्यस्थ पडलेली दिसली. तेव्हा पत्नीला हाक मारुन तु असे सर्व विस्कटुन का टाकले आहे. असे म्हणालो तेव्हा ती घरात आली. मी विस्कटले नाही असे म्हणाल्यावर आम्ही दोन्ही बेडरुमची लाईट लावुन पाहिले असता घरातील लोखंडी कपाट तेथेच चाव्याकरिता असलेल्या बॉक्स मधुन चावी घेवुन उघडुन त्यातील कपडे व इतर साहित्य अस्थाव्यस्थ पडले होते. त्या कपाटात कोणतेही मौल्यवान वस्तु नव्हत्या.

कपाटापासुन काही अंतरावर एक



पञ्याची पेटी होती. ती देखील चावीने खोलुन त्यात ठेवलेले रोख रक्कम व सोन्याचे दागिने मिळुन आले नाहीत. तसेच दुसऱ्या बेडरुम मधील कपाट चावीने खोलुन त्यातील सर्व सामान अस्थाव्यस्थ करुन टाकले असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

# संपादकीय......

जुने वर्ष-४२ वे
अंक-२१ वा

## १४० दशलक्ष लोकांना गरिबीतून बाहेर काढणारे सरकार भ्रष्टाचारविरोधी चळवळीने उध्वस्त

आयएसीच्या नेतृत्वाखालील भ्रष्टाचारविरोधी चळवळीसारख्या फार कमी मोहिमांनी जनतेचे लक्ष वेधून घेतले आहे. भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर व्यापक जनसमर्थन मिळवण्यात यश मिळवून दिल्लीत वादळ निर्माण झाले. या चळवळीने स्वतःला गैर-राजकीय क्षेत्रात स्थान दिले होते, कोणत्याही राजकारण्याला त्याचे व्यासपीठ नाकारले होते.

अनेक काँग्रेस नेत्यांनी, विशेषतः पी. चिदंबरम यांनी, हा मुद्दा खूप आधी मांडला होता, की आरएसएसने भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित करणाऱ्या कोणालाही पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता (प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया २०१३). त्यांचे ध्येय यूपीए-२ ला संपवणे होते. मनमोहन सिंग यांनी हजारे यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या असूनही - संयुक्त मसुदा समिती (जेडीसी), विशेष संसदीय अधिवेशन आयोजित करणे आणि शेवटी लोकपाल विधेयक मंजूर करणे - उजव्या विचारसरणीच्या लोकांना या मोहिमेत चांगले यश मिळाले. आयएसीची मोहीम भ्रष्टाचाराविरुद्धच्या चळवळीपासून नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील उजव्या विचारसरणीच्या सरकारच्या स्थापनेसाठी एक लाँचिंग पॅड बनली होती. आयएसी आंदोलनाचा शेवट एका अर्थाने यूपीएच्या मार्गाचा शेवट होता, जरी मागील एनडीए सरकारच्या काळात अर्थव्यवस्था खूपच चांगल्या स्थितीत होती. नियोजन आयोगाच्या अंदाजानुसार, २००४ ते २०१२ दरम्यान, अंदाजे १४ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यात आले, ही एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरी आहे. गरिबीचे प्रमाण किमान १५ टक्क्यांनी कमी झाले. ही भारताच्या इतिहासातील सर्वात जलद घट होती. २००४-२००५ आणि २००९-२०१० दरम्यान, श्रीमंत आणि गरिबांमधील दरी लक्षणीयरीत्या कमी झाली, कारण ४०% लोकसंख्येने वरच्या दिशेने हालचाल अनुभवली. तथापि, काँग्रेसने याचे कोणतेही श्रेय घेतले नाही आणि उदयोन्मुख (कमी) मध्यम वर्गात प्रवेश करणाऱ्या या वरच्या दिशेने फिरणाऱ्या १४ कोटी गरीब लोकांना आकर्षित केले नाही. त्या वेळी वापरल्या जाणाऱ्या पद्धतीनुसार, ते गरिबांवर लक्ष केंद्रित केले होते, जे लोकसंख्येच्या २२% पर्यंत घसरले होते. तथापि, या वर्गातील अनेक लोकांनी देखील त्यांच्या राजकीय निष्ठा बदलल्या होत्या. गरीबांच्या बाजूने बोलणाऱ्या या वक्तव्याने आता गरीब नसलेल्यांना फारसे प्रभावित केले नाही. याच वर्गांनी काँग्रेसला अवैध ठरवले आणि अखेरीस त्यांना मतदान करून बाहेर काढले.

या आंदोलनामुळे दिल्लीतील काँग्रेस सरकार आणि केंद्रातील युपीए सरकार या दोन सरकारांना अक्षरशः पाडण्यात आले, ज्यामुळे २०१४ मध्ये भाजपला सत्तेत येण्याची संधी मिळाली. 'आप'मध्ये रूपांतरित झालेल्या 'आयएसी'ने अप्रत्यक्षपणे उजव्या विचारसरणीच्या शक्तींना मदत केली. स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षानंतर, काँग्रेसच्या 'आम आदमी' व्यासपीठावर स्वामित्व मिळवणाऱ्या 'आप'ने डिसेंबर २०१३ मध्ये दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत नाट्यमय पदार्पण केले आणि काँग्रेसला चिरडून टाकले. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी माहिती अधिकार (आरटीआय) कायदा, 'व्हिसल ब्लोअर्स प्रोटेक्शन ॲक्ट', 'नागरिकांचा तक्रार निवारण हक्क विधेयक', 'सार्वजनिक खरेदी विधेयक' आणि 'न्यायिक जबाबदारी आणि मानके विधेयक' यासारख्या उपाययोजना सादर करूनही काँग्रेस भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर हरली. पण मोठा विजय भाजपला मिळाला. भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाच्या अकार्यक्षम हाताळणीमुळे आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांना तोंड देण्यात काँग्रेसच्या अकार्यक्षमतेमुळे काँग्रेसला पराभव पत्करावा लागला, ज्याचा त्यांच्या निवडणूक नशिबावर विध्वंसक परिणाम झाला.

भारताच्या संवैधानिक लोकशाहीने असमानतेला दूर करण्यास आणि गरिबांसाठी आणि त्यांच्या संवैधानिक हमींपर्यंत पोहोचण्यासाठी धोरणे आखण्यास सुरुवात केली तेव्हाच यूपीएची ताकद संपली. गुजरात मॉडेलला व्यवसायासाठी आश्रयस्थान आणि विकासासाठी उत्प्रेरक म्हणून प्रचार करण्यात कॉर्पोरेट माध्यमांनी महत्त्वाची भूमिका बजावली. विकासाच्या विविध आयामांमध्ये संतुलन साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या यूपीएच्या धोरणात्मक आदर्शाला बाजूला सारण्यात आले, ज्यामुळे उजव्या विचारसरणीला मार्ग मोकळा झाला.

### स्टार्टअप

## हॉस्टेल शोधण्यात अडचण आली,बेडआर इंडिया सुरू केले:विद्यार्थ्यांची ब्रोकरेजमधून सुटका




देशात विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्था शोधणे ही अजूनही एक मोठी समस्या आहे. तीन पदवीपूर्व विद्यार्थ्यांनी ही समस्या सोडवण्याचे काम हाती घेतले आहे. बेडआर इंडिया हे देशातील पहिले डिजिटल फर्स्ट टूल आहे जे विद्यार्थ्यांना पीजी आणि हॉस्टेल बुक करण्यास मदत करते. हे स्टार्टअप सध्या फक्त मुंबईतच काम करत आहे आणि सध्या त्यांच्याकडे ५ हजारांहून अधिक बेडचा पर्याय आहे.

बेडआरचे सर्वात लोकप्रिय वैशिष्ट्य म्हणजे 'शेड्यूल व्हिजिट', जे विद्यार्थ्यांना ॲपद्वारे त्यांच्या सोयीनुसार तारीख आणि वेळ सेट करून त्यांच्या प्रॉपर्टी भेटीचे वेळापत्रक तयार करण्यास अनुमती देते.

तुम्ही इशवठ वर मालमत्ता शोधू शकता आणि भेटीचे वेळापत्रक तयार करू शकता. पीजी आणि वसतिगृह मालकांना बेडआरवर एक मोफत डिजिटल डॅशबोर्ड मिळतो, ज्याद्वारे ते त्यांची इन्व्हेंटरी, लीझ्स आणि भाडे संकलन ऑनलाइन व्यवस्थापित करू शकतात. ही साधने केवळ ऑफलाइन समस्या दूर करत नाहीत तर रिअल-टाइम डेटासह व्याप्ती देखील वाढवतात. यामुळे मालमत्ता मालकांना अधिक दृश्यमानता आणि सुविधा मिळते, तर विद्यार्थ्यांना पारदर्शकता, सेवा आणि नियंत्रण मिळते.

ज्या क्षेत्रात सर्व काम ऑफलाइन केले जाते, तिथे आम्ही डिजिटल तंत्रज्ञान आणि विश्वास आणत आहोत.

- अर्जुन अग्रवाल, सह-संस्थापक आणि सीओओ

'आम्ही बेडआर इंडियाची निर्मिती केली कारण आम्हाला स्वतःला त्या कमतरता जाणवल्या.' विद्यार्थ्यांना चांगले पर्याय हवेत - आणि घरमालकांना चांगली साधने हवी आहेत.

लाँच झाल्यापासून, बेडआर इंडियाने मुंबईतील प्रमुख विद्यार्थी क्षेत्रांमध्ये झपाट्याने उपस्थिती निर्माण केली आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी आणि तरुण व्यावसायिकांसाठी हे पसंतीचे गृहनिर्माण भागीदार बनले आहे. त्याचे नो-ब्रोकर मॉडेल, सत्यापित सूची आणि मागणीनुसार भेटीचे वेळापत्रक वेगाने लोकप्रिय होत आहे.

विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी बनवलेले स्टार्टअप म्हणून, बेडआर इंडिया तंत्रज्ञान-प्रथम नवोपक्रमासह शहरी भारतातील सर्वात मोठ्या गृहनिर्माण समस्येपैकी एक सोडवत आहे. सध्या, ही टीम मुंबईत आपले पाय मजबूत करत आहे आणि लवकरच इतर प्रमुख महानगरांमध्ये विस्तार करण्याची योजना आखत आहे.

हे क्षेत्र बदलाच्या उंबरठ्यावर आहे आणि बेडआर इंडिया या क्षेत्रात एक परिभाषित ब्रँड म्हणून स्वतःला स्थापित करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

### सुविचार

**यशस्वी होण्यासाठी तुमची यशस्वी, होण्याची इच्छा अपयशी होण्याच्या भितीपेक्षा अधिक प्रबळ असली पाहिजे.**

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com

संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# चिलार निर्मूलनाने पाण्याची बचत होऊ शकते

## लोकसहभाग मिळाल्यास माणगंगा भ्रमणसेवा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने मोफत जेसीबी देणार



सांगोला : जलसंवर्धन पंधरवाड्यानिमित्त माणगंगा भ्रमणसेवा बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने असे आवाहन करण्यात येत आहे की, नदीपात्रातून व नदीच्या काठावर चिलार बाभळी मोठ्या प्रमाणात वाढल्याने पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होऊन त्याचा पाणीसाठ्यावर परिणाम होतो. वर्षानुवर्षे चिलार बाभळीचे प्रमाण वाढत चालल्याने नद्या, ओढे, बंधारे कोरडे पडू लागले आहेत. चिलार बाभळीची मुळे शंभर फुटाहून खोल जात असल्याने जमिनीच्या पोटातील पाणी मोठ्या प्रमाणात शोषण केले जाते.

माणदेशातील माण, कोरडा, अफ्रुका व बेलवण या नद्यांच्या पात्रात, नदी काठावर व त्यास मिळणाऱ्या ओढ्यावर चिलार बाभळीचे प्रमाण जास्त असल्याने पावसाचे पडणारे पाणी तसेच बंधाऱ्यात साठणारे पाणी चिलार बाभळीच्या शोषणाने लगेच संपते. या पाण्याची बचत व्हावी म्हणून आमच्या संस्थेच्या वतीने लोकसहभागातून गेल्या १० वर्षापासून माण नदीपात्रातील चिलार निर्मूलनाचे काम चालू आहे. नदीपात्र स्वच्छ झाल्यामुळे चार-पाच वर्षापासून माण नदीपत्रात व त्यावरील बंधाऱ्यात पाणी टिकून राहते. चिलार बाभळी काढल्या तरी वर्ष दोन वर्षात पुन्हा पूर्ववत वाढतात व पाण्याचा अपव्यय वाढतो. त्याकरिता चिलार निर्मूलनाची लोकचळवळ निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे व चिलार निर्मूलनाचे सातत्य राहिले तरच भविष्यात पाण्याची बचत मोठ्या प्रमाणात होऊ शकते. त्याकरिता नदीकाठची लाभार्थी गावे, ग्रामपंचायती, शेतकरी व नागरिक यांचा सहभाग वाढला पाहिजे.

या अभियाना करता ग्रामपंचायत, शेतकरी, नागरिक स्वयंस्फुर्तीने सहभागी होणार असतील आणि लोकांच्या सहभागातून चिलार निर्मूलनासाठी जेसीबी मशीन लावत असतील तर त्यांच्या मशीन बरोबर आमच्या संस्थेच्यावतीने मोफत मशीन पुरवठा केला जाईल. असे माणगंगा भ्रमणसेवा संस्थेच्या वतीने कळविण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी व संपर्कासाठी मो. नं. ९४२००९३५९९ किंवा ९५५२८९२६७० या क्रमांकावर संपर्क साधावा असे संस्थेच्या वतीने करण्यात आवाहन करण्यात आले आहे.




# फॅबटेक पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

## पियाजिओ कंपनीत १७ जणांची निवड

सांगोला : सोलापूर जिल्ह्यातील नामांकित आणि औद्योगिक क्षेत्रात विशासार्ह मानले जाणारे फॅबटेक पॉलिटेक्निक कॉलेज पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. नुकत्याच पार पडलेल्या पियाजिओ व्हेईकल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या कॅम्पस ड्राइव्हमध्ये महाविद्यालयातील १७ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. या उल्लेखनीय निवडीबाबत माहिती देताना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा.धनंजय शिवपूजे यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचं कौतुक केलं. या कॅम्पस ड्राइव्हमध्ये विद्यार्थ्यांची तांत्रिक चाचणी व मुलाखतीद्वारे कसून चाचपणी करण्यात आली. त्यांच्या सखोल तांत्रिक ज्ञानाने कंपनीच्या निवड समितीला प्रभावित केलं आणि त्यांनी मेकॅनिकल विभागातील ज्ञानेशरी गावडे, प्रितम बिळगीकर,शिवम लोखंडे,अभिजित जगताप,आदित्य खांडेकर,अशितोष खांडेकर,सागर लोखंडे,महेश राऊत अशा ८ आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील उमा बाबर,अनुराधा माने,ज्योती बंडगर,प्रतिक्षा लोखंडे,साक्षी बंडगर,आरती सपताळे,आकांक्षा लिगाडे,सायली ताटे,तनुजा नागटिळक अशा ९ विद्यार्थ्यांची निवड केली. पियाजिओ ही जागतिक स्तरावर प्रसिद्ध कंपनी असून तिची वेस्पा स्कूटर, अप्रिला स्पोर्ट बाईक आणि तीन चाकी आपे ही वाहने घराघरात ओळखली जातात. अशा प्रतिष्ठित कंपनीमध्ये विद्यार्थ्यांची निवड होणे, ही फॅबटेक पॉलिटेक्निकच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रणालीची साक्ष आहे, असे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. तानाजी बुरुंगले यांनी सांगितले. या विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे समन्वयक प्रा.तन्मय ठोंबरे व प्रा. राहुल काळे यांचे मार्गदर्शन लाभले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती निलवर्णा रुपनर, उपाध्यक्ष श्री. भाऊसाहेब रुपनर, सचिव डॉ.अमित रुपनर, कार्यकारी संचालक श्री दिनेश रुपनर, कॅम्पस डायरेक्टर डॉ.संजय आदाटे, मेकॅनिकल विभागाचे विभाग प्रमुख प्रा.दत्तात्रय नरळे, इलेकट्रॉनीक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे विभाग प्रमुख प्रा.महेश वाळूजकर यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा...
साप्ताहिक
माणदेश वार्ता



# सांगोल्यातील ब्रह्म ओढा परिसरात पक्षांची मांदियाळी

## विविध प्रकारचे सुंदर व आकर्षक स्थानिक पक्षी मोठ्या संख्येने दाखल





सांगोला : सांगोला शहरा नजीक सांगोला– पंढरपूर महामार्गाच्या बाजूस ब्रह्मओढा हा विस्तृत जलाशय आहे. विस्तीर्ण जलाशय, लहान–मोठ्या माशांची पुष्कळ उपलब्धता, निसर्गमय व निरव शांतता असणारा हा परिसर तसेच त्यालगत असणारा शेतीचा भाग हा अनेक स्थानिक व परदेशी पक्षांसाठी नंदनवन ठरला आहे. उन्हाची तीव्रता वाढत असल्याने परदेशी पाहुण्या उपक्षांनी त्यांच्या परतीचा प्रवास सुरू केला आहे. पाण्याची पातळी खाली गेल्याने मात्र स्थानिक पक्षांना तलावातील मासे पकडणे सहज सोपे झाले आहे. या कारणामुळे एप्रिल महिन्याच्या मध्यावर ऐन उन्हाळ्यामध्ये सकाळी व संध्याकाळी ब्रह्म ओढ्यावर स्थानिक पक्षांची मांदियाळी पाहायला भेटत आहे.

सांगोल्यातील पक्षी व वन्यजीव अभ्यासक आणि सांगोला महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत असणारी प्रा.डॉ.प्रकाश बनसोडे हे ब्रह्म ओढ्यावर पक्षी निरीक्षणासाठी गेले असता त्यांना विविध प्रकारचे सुंदर व आकर्षक स्थानीक पक्षी मोठ्या संख्येने आढळून आले. यामध्ये प्रामुख्याने किंगफिशर म्हणजेच खंड्या पक्षी याच्या सामान्य खंड्या, कवडा खंड्या व पांढऱ्या छातीचा खंड्या अशा तिन्ही प्रजाती आढळून आल्या. हे पक्षी पाण्यामध्ये सूर मारून मासा पकडण्यामध्ये पारंगत असतात. तसेच त्यांना पानकोंबडीच्या पांढऱ्या छातीची पानकोंबडी किंवा लाजरी आणि जांभळी पानकोंबडी या दोन प्रजाती आढळल्या. बदकांमधील भारतीय हळदी–कुंकू बदके तसेच वारकरी बदके मोठ्या संख्येने येथे पहावयास भेटतात. तर पाणथळी जवळ आढळणारे लहान व मोठे पानकावळे, पानलावा,धारीदार बगळा, चमचा पक्षी, राखी बगळा, भारतीय मोठा बगळा, ढोर बगळा, ढोकरी किंवा वंचक, ठिपकेवाला तुतारी, आशिया खंडातील थोर पक्षी तज्ञ डॉ. सलीम अली यांच्या मते सोलापूर जिल्हा हा पक्षांच्या जैविक विविधतेच्या दृष्टीने निसर्ग समृद्ध आहे. सांगोला तालुक्यात देखील विविध जलाशय, पाणथळेची ठिकाण, शेती परिसर व माळरान असल्याने पक्षांच्या व सस्तन प्राण्यांच्या विविध प्रजाती येथे आढळतात. ब्रह्म ओढ्यावर पन्नासहून अधिक पक्ष्यांच्या प्रजाती आढळतात असे मत प्रा. डॉ. प्रकाश बनसोडे यांनी व्यक्त केले.

चिखल्या, शेकाट्या, काळ्या डोक्याचा तसेच लाल डोक्याचा शराटी इत्यादी पक्षी परिसरात आढळले. तसेच आकाराने लहान असणारे लखलखता शिंजीर, राखी वटवट्या, शुभ्रकंठी, कवडा गप्पीदास, सुगरण, वेडा राघू, कोतवाल, गाणंपक्षी असणाऱ्या दयाळांच्या विविध प्रजाती, स्थलांतर करून येणाऱ्या धोबी पक्षांच्या कवडा धोबी, पिवळा धोबी, करडा धोबी अशा विविध प्रजाती नोंदवता आल्या. माळरानावर आढळणारे टिटवी, खाटीक, उदी खाटीक हे पक्षी देखील आढळतात. ओढ्या जवळील बाभळीच्या

झाडांवर सुगरणीने विणकाम करून मोठ्या संख्येने घरटी उभी केली आहेत. सुगरणीकडून वापरात नसलेल्या या घरट्यांमध्ये शुभ्र कंठी मुनियांचे वास्तव्य आढळते.

या लहान पक्षांच्या सोबतच आकाराने मोठे असणारे पक्षी यामध्ये चित्रबलाक व लोकरी मानेचा करकोचा हे मोठ्या संख्येने आढळतात. सदर परिसरात बाजार कृषी उत्पन्न समितीचे धान्याची गोदामे असल्याने उंदरांची संख्या मोठी असून त्यांची शिकार करण्यासाठी, पिंगळा हे लहान आकाराचे घुबड, भारतीय घार तसेच शिक्राघार, कापशी घार हे शिकारी पक्षी देखील वास्तव्यास आहेत. तसेच छोटा होला, कंठेरी होला, कंठेरी पोपट आणि कबुतरे मोठ्या संख्येने आश्रय घेतात. ब्रह्म ओढ्या जवळील शेतांमध्ये मोर व तितर हे पक्षी आढळतात.

सांगोला शहरा लगत असणाऱ्या ब्रह्म ओढ्याचे पक्षांचे नंदनवन म्हणून संवर्धन होणे ही काळाची गरज आहे. याउ कामी सांगोला वनविभाग, पक्षी व प्राणी प्रेमी संघटना, नगरपरिषद प्रशासन व नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

या पक्षांना परिसरातील मोठ्या संख्येने वाढलेल्या भटक्या कुत्र्यांकडून जखमी करणे किंवा मारून खाणे असे प्रकार घडत आहेत. या भटक्या श्वानांचा सांगोला नगरपरिषदेने तात्काळ बंदोबस्त करावा व पक्षांचे संरक्षण करावे.

–प्रा.डॉ.प्रकाश अरुण बनसोडे ,
पक्षी व वन्यजीव अभ्यासक, सांगोला

# महुद येथे शेतकऱ्यांकडून फलटणच्या नेत्यांना जोडे मारो आंदोलन



सांगोला : महूद येथे शिवसेना व निरा देवधर लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांच्यावतीने फलटणचे नेते संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्या प्रतिकात्मक चित्राला जोडी मारून जाहीर निषेध करून घोषणाबाजी करत जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

बुधवारी मुंबई येथे राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर व माजी आमदार शहाजीबापू पाटील व इतर नेत्यांच्या उपस्थितीत निरा–देवधरचे पाणी सांगोला तालुक्यातील लाभक्षेत्रात तसेच पंढरपूर तालुक्यातील काही भागाला एक टीएमसी पाणी मंजूर करायचे ठरले असून तसा शासन निर्णयही झाला आहे. पिढ्यान्‌पिढ्या पाण्यासाठीधरपडणारी शेतकरी व कष्टकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून शहाजीबापू पाटील यांचा सांगोल्यात ठीक ठिकाणी सत्कार फटाक्यांची आतिषबाजी व पेढे भरून याचा कार्यक्रम झाला,उ यालाच गालबोट म्हणून फलटण येथे काही नेत्यांची बैठक होऊन काही लोकांनी सांगोला तालुक्याला व पंढरपूरला पाणी देण्याबद्दल विरोध दर्शवला म्हणून आज महूद येथे शिवसेनेच्या वतीने व लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या वतीने संजीवराजे निंबाळकर यांच्या प्रतिमेला जोडे मारून विरोधात घोषणा देऊन आंदोलन करण्यात आले.

यावेळी शहाजीबापू पाटील यांच्या नावाचा जयजयकार करण्यात आला. यावेळी उपस्थित शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, संजय मेटकरी, राजेंद्र मिटकरी,उ सरपंच सुरेश कदम, कालिदास भोसले, प्रमोद उबाळे, नवनाथ येड्गे, ओंकार पाटील, अरुणभाऊ नागणे, सोमनाथ मरगर, तानाजी भोसले, उदयसिंह पाटील, दीपक सरगर, चेअरमन महेश पाटील, कुंडलिक पवार, अमोल सरडे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# भाजप पदाधिकाऱ्यांनी पक्षातील गट तट बाजूला ठेवून काम करावे-मकरंद देशपांडे

सांगोला : सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यातील ५ विधानसभा मतदारसंघातील १४ मंडल. अध्यक्षांच्या इच्छुकांच्या मुलाखती शुक्रवारी सांगोल्यात पार पडल्या. प्रत्येकाला संघटनेत पद देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. मंडल अध्यक्ष पदावर नियुक्ती झाल्यानंतर पदाधिकाऱ्यांनी पक्षातील गट तट बाजूला ठेवून कार्यकर्त्यांना विशासात घेऊन पक्ष वाढीसाठी काम करावे अशा सूचना पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे यांनी दिल्या.. सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यातील बार्शी, करमाळा, माढा, माळशिरस, सांगोला या विधानसभा मतदारसंघातील मंडल अध्यक्ष पदासाठी इच्छुकांच्या उमुलाखती शुक्रवार १७ एप्रिल सांगोल्यात पार पडल्या. यावेळी भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंडल अध्यक्ष पदासाठी आलेल्या इच्छुकांच्या मुलाखती घेण्यासाठी निरीक्षक म्हणून पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे, पश्चिम महाराष्ट्र निवडणूक प्रमुख विक्रम पावसकर, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी घेतल्या. यावेळी भाजप महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष रश्मी बागल, बार्शी विधानसभा निवडणूक प्रमुख रणवीर राऊत, राजकुमार पाटील, केशव पाटील, जिल्हा महामंत्री सचिन शिंदे, गणेश चिवटे, सुजित थिटे यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# सांगोला न्यायालयात १० मे रोजी राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन

सांगोला : सांगोला येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात शनिवार दिनांक १० मे २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करणेत आलेले आहे. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण सोलापूर व मुंबई यांचेकडील आदेशान्वये सदरचे लोकन्यायालय भरविण्यात येणार आहे. सदर लोकन्यायालयात या न्यायालयातील दिवाणी दावे, फौजदारी प्रलंबीत खटले, चेक न वठलेल्या १३८ एन.आय.ॲक्टचे खटले, पोटगीचे खटले, थकीत विद्युत बिले न भरलेले प्रकरणे, भारत संचार निगम लि., बँकेची थकीत कर्जे न भरलेले प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. तसेच दाखलपूर्व बँकेची प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. तरी संबधित पक्षकार तसेच विधीज्ञ यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीमती बी.एम. पोतदार, अध्यक्ष, सांगोला तालुका विधी सेवा समिती तथा दिवाणी न्यायाधिश क. स्तर, सांगोला तर्फे करणेत येत आहे.

# माणुसकीला काळीमा फासणारी घटना; सांगोला तालुक्यातील कडलास येथे जन्मदात्या आईचा मुलाने केला खून!

सांगोला : सांगोला तालुक्यातील कडलास येथे रतन शहाजी साळुंखे या महिलेची दारूच्या नशेत पोटच्या मुलानेच केबलच्या साह्याने जन्मदात्या आईचा गळा आवळून खून केल्याचे निष्पन्न झाले असून मुलगा तुकाराम याला अटक करून सांगोला येथील न्यायालयासमोर पोलिसांनी हजर केले असता त्यास २२ एप्रिल पर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी ठोठावली आहे.

या खळबळजनक व म ाणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटनेबाबत माहिती अशी की गुरुवार १७ एप्रिल रोजी कडलास येथील चौकातीलबौद्ध समाज मंदिराच्या छतावर महिलेने आत्महत्या केल्याची फिर्याद पोलीस पाटील रघु– नाथ ननवरे यांनी दिली होती त्यानुसार सांगोला पोलिसांनी ग्रामीण रुग्णालय येथे सदर महिलेला शवविच्छेदनासाठी आणले असता शवविच्छेदन केल्यानंतर सदर महिले– ने आत्महत्या केली नसून खून झाल्याचे निष्पन्न झाले त्यानुसार सांगोला पोलिसांनी तपास केला असता मृत महिलेचे अंत्यसंस्कारानंतर मुलगा तुकाराम शहाजी साळुंखे यास पोलिसांनी ताब्यात घेतले असता त्यांने खूनाची कबुली दिली.

मुलगा तुकाराम यास दारूचे व्यसन होते व तो आई–वडिलांबरोबर दररोज भांडण शिवीगाळ करीत असे बुधवार १६ एप्रिल रोजी ही त्यांने आई–वडिलांबरोबर भांडण केले होते वैतागून आई घर सोडून समाज मंदिरात जाऊन झोपली होती इकडे तुकाराम दारूच्या नशेत रात्रभर आईच्या शोधात सर्वत्र फिरत असताना आई ही समाज मंदिरात झोपलेली दिसली त्यांने समाज मंदिरात आईला मारहाण करून तिचा

**आत्महत्या केल्याचा केला होता बनाव!**

सदर घटनेमध्ये मयत आई रतन साळुंखे यांना मारहाण करून जीवे मारल्यानंतर आरोपी मुलगा तुकाराम साळुंखे याने समाज मंदिराच्या वर वायरने गळा आवळून मयत रतन साळुंखे यांनी आत्महत्या केली असल्याचे बनाव केले होते सदर घटनास्थळी भेट देऊन डीवायएसपी विक्रांत गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन केलेल्या मार्गदर्शनावरून पोलीस निरीक्षक भिमराव खणदाळे यांनी आपल्या प्रदीर्घ अनुभवाचा कस लावून तपास करून सदर घटनेतील आरोपीला बेड्या ठोकल्या.केबलच्या साह्याने गळा आ वळून खून केला व मृतदेह समाज मंदिराच्या छतावर गळ्याभोवती काळी केबल गुंडाळून सोडून निघून गेलादरम्यान गुरुवारी सरपंच दिगंबर भजनावळे यांनी पो– लीस पाटील रघुनाथ ननवरे यांना सदर घटनेबाबत माहिती दिली व पोलीस पाटील यांनी सांगोला पोलिसांना कळविले पोलिसांनी घटनास्थळी परिस्थितीची पाहणी करून व शवविच्छेदनाच्या माहितीवरून मृत महिलेच्या अंत्यसंस्कारानंतर मुलगा तुकाराम यास अटक केली व त्यास सांगोला येथील फौजदारी न्यायालयासमोर हजर केल्यानंतर त्यास न्यायालयाने २२ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे.